IO

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर **P.S.(ठाणे):** वर्तक नगर **Year (वर्ष):** 2022

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0141 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 02/04/2022 01:55 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 01/04/2022

**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 01/04/2022

**Time From (वेळेपासून):** 11:49 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 11:49 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 02/04/2022 **Time (वेळ):** 01:24 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 005 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/04/2022 01:24 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** येऊर गेटचे प्रवेश द्वार,वन विभागाचे कार्यालयात ,ठाणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अधिक सुरेश वालम

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1992 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 11/01,वरली पाडा रोड, श्रीनगर,साई सदन चाळ,जि ठाणे,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 11/01,वरली पाडा रोड, श्रीनगर,साई सदन चाळ,जि ठाणे,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-8898879889**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनंत एतवार घरत - नाकेदार | | | 1. वनपरिक्षेत्र ,येऊर,संजय गांधी राष्ट्रीय उद्यान,ठाणे,वर्तक नगर,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | बाळकष्ण जयराम सावंत- वनमजुर | | | 1. वनपरिक्षेत्र ,येऊर ,संजय गांधी राष्ट्रीय उद्यान,ठाणे,वर्तक नगर,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2,500/रूपये | 2,500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 2,500.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्तकनगर पो स्टे गु रजी नं.141/2022 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988चे कलम 7 प्रमाणे फिर्यादी - अधिक सुरेश वालम वय.30 वर्षे, धंदा-कुरिअर, राह- साई सदन चाळ, 11/01, वरली पाडा रोड, श्रीनगर, जि. ठाणे (मोबाईल क्रमांक 8898879889)आरोपी -1) अनंत एतवार घरत,वय 56 वर्षे, नाकेदार, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, वनपरिक्षेत्र ,येऊर, ठाणे 2) बाळकृष्ण जयराम सावंत, वय. 59,वनमजुर, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, वनपरिक्षेत्र ,येऊर, ठाणे,गु घ ता वेळ व ठिकाण - दिनांक 01/04/2022 रोजी 11.49 वाजता येऊर गेटचे प्रवेश द्वार वन विभागाचे कार्यालयात ठाणे स्वीकारलेले रक्कम- 2,500/-रूपये हकिकत - तरी फिर्यादी यांनी लाचेचे मागणी संदर्भात दिलेल्या तक्रारीवरुन दि. 01/04/2022 रोजी करण्यात आलेले पडताळणी कारवाईत 1) अनंत एतवार घरत,वय 56 वर्षे, नाकेदार, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, वनपरिक्षेत्र ,येऊर, ठाणे 2) बाळकृष्ण जयराम सावंत, वय. 59,वनमजुर, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, वनपरिक्षेत्र ,येऊर, ठाणे यांनी त्यांना लोकसेवक या नात्याने मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरुपयोग करुन, आमचे कुरियर कंपनीचे येऊर, ठाणे येथे आयोजित करण्यात आलेल्या पार्टी करीता येणा-या 14 चारचाकी वाहने व त्यातील 30 इसमांना वाहना सह येऊर येथे सोडण्यासाठी शासकीय फि 5964/-रूपये इतकी होत असतांना वाहने व त्यातील इसम यांना विनापावती सोडण्याकरीता 3,000/- रूपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 2,500/- रूपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य करुन रचलेल्या पडताळणी कारवाईत मागणी केलेली 2,500/-रूपये लाचेची रक्कम सापळा कारवाईचे वेळी स्विकारली असता पोनि/सुरेश चोपडे व त्यांचे अन्टी करप्शन ब्युरोचे सापळा पथकाने दोन्ही लोकसेवकांना 11.49 वाजता रंगेहात पकडले म्हणून फिर्यादी लोकसेवक 1) अनंत एतवार घरत, 2) बाळकृष्ण जयराम सावंत, यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988चे कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे. मी, अधिक सुरेश वालम वय.30 वर्षे, धंदा-कुरिअर, राह- साई सदन चाळ, 11/01, वरली पाडा रोड, श्रीनगर, जि. ठाणे (मोबाईल क्रमांक 8898879889)
मी वरील प्रमाणे असुन नमुद पत्यावर माझे कुंटुबासह राहण्यास आहे. मी कुरिअर कंपनीत नोकरी करीत असुन त्यावर माझा व माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो.
दिनांक 01/04/2022 रोजी आमचे कुरिअर कंपनीचे ग्रुपचे येऊर येथे पार्टी आयोजित केली होती. त्या पार्टीचे आयोजन मी येऊर येथील

कोळी फार्म येथे आयोजित केले होते. त्याबाबत मी कोळी फार्मचे केअरटेकर यांच्याशी बोलणी केली होती. परंतु येऊर चे प्रवेषद्वारावर वन विभागाचे कर्मचारी हे गाडया थांबवुन वरती सोडण्यासाठी पैशाची मागणी करीत असतात. मी त्याबाबत तेथील नाकेदार घरत साहेब व वनमजुर सावंत साहेब यांना भेटलो असता घरत चौकीचे दरवाजावर उभे होते. वनमजुर सावंत हे चौकीचे आत कॉम्प्युटर समोर खुर्चीवर बसले होते. नाकेदार घरत यांनी मला चारचाकी प्रत्येक वाहनाचे 261/-रुपये व त्यातील प्रत्येक इसमाचे 77/-रु असा हिशोब सांगितला. त्यावेळी मी 14 वाहने व 30 इसम असे सांगितले असता वनमजुर सावंत यांनी त्यांचे समोरील टेबलवरील कॅलक्युलेटरवर 14 वाहनांचे 3654/-रुपये व 30 इसमांचे 2310/-रुपये असे एकुण 5964/-रुपये होत असल्याचे सांगितले. मी त्यांना पावतीबाबत विचारले असता त्यांनी मला पावती दिली तर पैसे जास्त होतील असे सांगितले. त्याएवजी 3000/-रु दया व सर्व गाडया व इसम असेच घेवुन जा असे सांगितले. अशा प्रकारे वरील लोकसेवक यांनी माझेकडे 3000/-रुपये लाचेची मागणी केली होती. मला लोकसेवक यांना तीन हजार रूपये लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी लोकसेवक नाकेदार घरत साहेब व वनमजुर सावंत साहेब यांचेवर कारवाई व्हावी म्हणुन पोलीस निरीक्षक सुरेश चोपडे, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांना दिनांक 01/04/2022 रोजी सकाळी 09.30 वा. लेखी तक्रारी अर्ज दिला असता त्यांनी तो वाचुन पाहिला. पोलीस निरीक्षक सुरेश चोपडे यांनी त्यांचे कार्यालयात उपस्थीत असलेले स्टाफ सपोउपनि/विचारे,सोंडकर,पोहवा/परदेशी,ब.नं.212, पोना/संदेश शिंदे, ब.नं.5351, मपोना/गणपते, चापोहवा/चैधरी यांचा परिचय करुन देवुन ते पडताळणी सापळा कारवाईचे उपस्थीत राहाणार असल्याचे सांगितले. पोलीस निरीक्षक सुरेश चोपडे यांनी लागलीच त्यांचेकडील राखीव पंच यांना अँन्टी करप्षन ब्युरो, ठाणे अंतर्गत राबोडी कार्यालय येथे बोलावुन घेतले. 10.00 वाजताचे सुमारास एक महिला व एक पुरुष पोलीस निरीक्षक सुरेश चोपडे यांचे कार्यालयात उपस्थीत झाले. पोनि/सुरेश चोपडे यांनी ते पंच साक्षीदार असल्याचे सांगुन दोन्ही पंचांची मला व माझा पंचांना परिचय करुन दिला. तसेच वरील पडताळणी/सापळा पथकातील अंमलदार यांचा पंचांना परिचय करून दिला. त्यावेळी पोलीस निरीक्षक/सुरेश चोपडे यांनी माझे तक्रारीची थोडक्यात हकीगत दोन्ही पंचांना सांगण्यास सांगितली. त्यानंतर पोनि/सुरेश चोपडे यांनी माझी लेखी तक्रार पंचांना वाचावयास दिल्यानंतर त्यांनी ती तक्रार वाचून पाहिली व नंतर पंचांनी माझे तक्रारी अर्जावर पंच म्हणून स्वाक्षरी केल्यानंतर पोलीस निरीक्षक/सुरेश चोपडे यांनी समक्ष म्हणून स्वाक्षरी करून सदरचा तक्रारी अर्ज ताब्यात घेतला.

सदरवेळी मी पोलीस निरीक्षक/सुरेश चोपडे यांना लोकसेवक यांना येऊर चेकपोस्ट येथे भेटण्यास जाणार असल्याचे सांगितले. त्यामुळे माझे सांगणे नुसार प्रथम पडताळणी कारवाई व परिस्थीती नुसार पुढील सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे पोनि/सुरेश चोपडे यांनी सांगुन दोन्ही पंच व पडताळणी पथकास योग्य त्या सुचना दिल्या. मी माझे मोटर सायकलवर पंच श्री कांबळे, पोनि/सुरेश चोपडे,सपोउपनि/विचारे असे त्यांचे बुलेटवर, सपोउपनि/सोंडकर हे त्यांचे अँसेस मोटर सायकलवर, उर्वरीत पथक शासकीय वाहनातुन पायलादेवी मंदिर, येऊर येथे आलो.

माझे तक्रारीचे अनुषंगाने पोनि/सुरेश चोपडे यांनी पंचांच्या उपस्थीतीत सर्व कायदेशीरबाबींचा अवलंब करून केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान मला व्हाईस रेकॉर्डरसह पंच नं. 1 श्री विकास कांबळे यांचे सोबत लोकसेवक नाकेदार घरत व वनमजुर सावंत यांना भेटण्यासाठी त्यांचे येऊर चेक पोस्ट,ठाणे येथे पाठविले असता दोन्ही लोकसेवक चेकपोस्टवर उपस्थीत होते. त्यावेळी मी लोकसेवक यांना भेटलो त्यावेळी लोकसेवक घरत हे मला ''माणसे किती आहेत.....काय..'' असे म्हणाले त्यावेळी मी ''...30 आहेत....25 ....26 जण ....पर्यंत येतील असे म्हणालो. तेंव्हा लोकसेवक घरत मला म्हणाले ''गाडया किती हायत'' त्यावेळी मी लोकसेवक घरत यांना म्हणालो. फोर व्हीलर 13...14... त्यावेळी लोकसेवक घरत यांनी मला कॅल्षीवर 3000 टाईप करुन एवढे येतायत असे म्हणाले. तेंव्हा मी आमचे कंपनीचा एच.आर.आहे ना .... त्याचेकडे पैसे आहेत तो येतोय आता असे लोकसेवक यांना सांगुन निघुन आलो. अशी हकिगत कथन केली.

सदर संभाशणादरम्यान लोकसेवक यांनी फक्त कॅल्क्युलेटरवरच लाचेची रक्कम टाईप केली परंतु शब्दांद्वारे सुस्पष्ट अशी लाचेची मागणी न केल्याने पुनःष्च पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने मला पुन्हा डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावुन पंचासोबत लोकसेवक यांना भेटण्यास पाठविले. त्यावेळी लोकसेवक घरत यांचेशी बोलणी केली असता मी त्यांना बोललो तिन हजार, ते बोलले तिन हजार रुपये जास्त होतात... त्यावर लोकसेवक घरत म्हणाले की, ''सहा हजार चे पुढे सहा हजार रुपयाचे वर झाले होते..आर्धे केले मी, एका गाडीचेच केवढे होतात पाचशे सहाशे म काय कमी झाले'' त्यावर मी लोकसेवकास बोललो की,

''मी काय म्हणतो तुम्ही अडीच घ्या मी आता आणतो काढुन '' ........ त्यावर लोकसेवक घरत म्हणाले की, ''आजुन काढुन आणले नाय..असे म्हणुन दुसरे लोकसेवक सावंत यांना जावु दया ना... तो बघ काय म्हणतोय.....अडीच देतो म्हणतोय......ए सावंत असे म्हणाले आणि मला '''जा लवकर घेवून या जा पैसे, काढून घेवून या पटकन...'' असे म्हणाले म्हणुन लोकसेवक घरत यांना आलो मी लगेच जरा....घेवुन...पण येतो असे म्हणुन मी पडताळणी पथकजवळ परत आलो व पंच नं. 1 यांचेवर कोणाचा संषय येवु नये म्हणुन त्यांना लोकसेकवकाच्या आँफीसचे बाहेरच थांबण्यास सांगुन मी परत आलो.

त्यावेळी मी घडलेली हकिगत पोनि/सुरेश चोपडे व पंच सौ गावीत यांना सांगितली. पोनि/सुरेश चोपडे यांनी पंच सौ गावीत यांचे समक्ष डिजीटल व्हाईस रेकॉर्डरवरील संभाषण एकले असता ते मी सांगितलेल्या हकिगती प्रमाणे बरोबर होते. लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

पोलीस निरीक्षक श्री.सुरेश चोपडे यांनी लोकसेवक नाकेदार घरत साहेब व वनमजुर सावंत साहेब यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना देण्यासाठी रुपये अडीच हजार रूपये उपलब्ध आहेत का ? याबाबत विचारणा केली. त्यांना मी कुरिअर कंपनीचे येऊर येथील पार्टीकरीता जमा असलेल्या रकमेतुन पोलीस निरीक्षक श्री.सुरेश चोपडे यांचे समक्ष हजर केली. पोलीस निरीक्षक सुरेश चोपडे यांनी सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करुन वेळे अभावी लागलीच सापळा पुर्व कारवाई करुन सापळा कारवाईचे अनुषंगाने मला,पंच सौ गावीत याना व सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि/सुरेश चोपडे यांनी लागलीच लोकसेवक नाकेदार घरत व वनमजुर सावंत यांचे विरूध्द सापळा अजमावण्यात येणार असल्याचे सांगुन मला लोकसेवक नाकेदार घरत व वनमजुर सावंत यांना त्यांचे मागणीप्रमाणे लाचेची रक्कम रुपये अडीच हजार रुपये देण्याकरीता माझे शर्टाचे आत बनियन मध्ये डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच नं. 1 श्री. कांबळे हे येऊर चेक पोस्ट येथे थांबलेले असल्याने मला एकटयालाच लोकसेवक यांना पैसे देण्यास पाठविले. माझे पाठोपाठ पोनि/सुरेश चोपडे सपोउपनि/विचारे असे बुलेटवर, सपोउपनि/सोंडकर त्यांचे अँसेस मोटर सायकलवर व सापळा पथक असे येऊर चेकपोस्टचे आजुबाजुस कोणास संशय येणार नाही अशारितीने थांबुन राहिले. मी माझी मोटर सायकल येऊर चेकपोस्ट जवळ थांबवुन पंच नं. 1 श्री विकास कांबळे हे तेथेच थांबले असल्याने त्यांचे समोर लोकसेवक घरत व सावंत यांचेशी लाचे संबधी कोणाकडे दयायचे असे घरत यांना विचारले असता त्यांनी आत जाण्याचा इशारा केला त्यावेळी सावंत यांनी त्यांचे डावे बाजुचा ड्रॉव्हरचा खण उघडुन हा तिथे ठेवा......असे म्हणुन ड्रॉव्हरमध्ये पैसे ठेवण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी ड्रॉव्हरमध्ये पैसे ठेवले व बाहेर येवुन पंचासमक्ष माझा मित्र मनोज साळुखे यांस फोन करुन नियोजित इशारा केला. तसे पोनि/सुरेश चोपडे साहेब व सापळा पथकाने दोन्ही लोकसेवक यांना दिनांक 01/04/2022 रोजी 11.49 वाजता रंगेहात पकडले आहे.

सदर वेळी पोनि/सुरेश चोपडे यांनी दोन्ही लोकसेवक यांना आपली ओळख सांगुन त्यांचे टेबलचे ड्रॉव्हर? मध्ये ठेवलेली अडीच हजार लाचेची रक्कम काढुन पंच क्रमांक 1 श्री.कांबळे यांचे ताब्यात दिली. पंच क्रमांक 1 श्री कांबळे यांनी सदर अडीच हजार लाचेच्या रक्कमेतील नोंटाचे

क्रमांक पडताळुन पाहिले असता ते सापळापुर्व कारवाई दरम्यान नोंदविलेल्या क्रमांकाशी जुळुन आले. त्यांनतर सदर लोकसेवक यांची अल्ट्राव्हायलेट दिव्याचे तपासणीची प्रक्रिया पुर्ण करुन पोलीस निरीक्षक सुरेश चोपडे यांनी त्याचे पुर्ण नांव पत्ता विचारले असता त्यांने त्यांची नावे 1) अनंत एतवार घरत,वय 56 वर्षे, धंदा .नाकेदार, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, वनपरिक्षेत्र ,येऊर, ठाणे 2) बाळकृष्ण जयराम सावंत, वय. 59, वनमजुर, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, वनपरिक्षेत्र ,येऊर, ठाणे, राह. लोकमान्यनगर, ठाणे असे असल्याचे सांगितले. त्यानंतर नमुद लोकसेवक यांना सापळा पथकाने ताब्यात घेवुन नजीकचे कक्षात आणुन त्या ठिकाणी पुढील कारवाई पुर्ण केली.

तरी मी लाचेचे मागणी संदर्भात दिलेल्या तक्रारीवरुन दि.01/04/2022 रोजी करण्यात आलेले पडताळणी कारवाईत 1) अनंत एतवार घरत,वय 56 वर्षे, नाकेदार, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, वनपरिक्षेत्र ,येऊर, ठाणे 2) बाळकृष्ण जयराम सावंत, वय. 59,वनमजुर, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, वनपरिक्षेत्र ,येऊर, ठाणे यांनी त्यांना लोकसेवक या नात्याने मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरुपयोग करुन, आमचे कुरियर कंपनीचे येऊर, ठाणे येथे आयोजित करण्यात आलेल्या पार्टी करीता येणा-या 14 चारचाकी वाहने व त्यातील 30 इसमांना वाहनां सह येऊर येथे सोडण्यासाठी शासकीय फि 5964/-रुपये इतकी होत असतांना वाहने व त्यातील इसम यांना विनापावती सोडण्याकरीता 3,000/- रूपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 2,500/-रूपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य करुन रचलेल्या पडताळणी कारवाईत मागणी केलेली 2,500/-रूपये लाचेची रक्कम सापळा कारवाईचे वेळी स्विकारली असता पोनि/सुरेश चोपडे व त्यांचे अँन्टी करप्शन ब्युरोचे सापळा पथकाने दोन्ही लोकसेवकांना 11.49 वाजता रंगेहात पकडले म्हणून माझी लोकसेवक 1) अनंत एतवार घरत, 2) बाळकृष्ण जयराम सावंत, यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988चे कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): SADASHIV VISHNU NIKAM (I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
बर्तकनगर पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): SADASHIV VISHNU NIKAM

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)